# MAHARASHTRA ACT No. 1 OF 1961.

## AN ACT TO PROVIDE FOR THE PROTECTION, CONSERVATION AND DEVELOPMENT OF FISHERIES IN THE STATE OF MAHARASHTRA.

# सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

[ राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक ३ जानेवारी १९६१ रोजीं प्रथम ( इंग्रजींत ) प्रसिद्ध केलेला. ]

## महाराष्ट्र राज्यांत मासेमारीच्या धंद्याचें संरक्षण, जोपासना आणि विकास यांसाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यांत मासेमारीच्या धंद्याचें संरक्षण, जोपासना आणि विकास यांसाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्राचा मासेमारीबाबत अधिनियम, १९६० असें म्हणावें. लघु संज्ञा, व्याप्ति व प्रारंभ.

(२) तो संबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणें आवश्यक नसेल तर, या अधिनियमांत,— व्याख्या.

(अ) "मासळी" या संज्ञेंत कवचाची मासळी, कालव आणि इतर सस्तन्यांच्या मासळीचा समावेश होतो ;

(ब) "मत्स्याधिकारी" या संज्ञेचा अर्थ, राज्य सरकारनें, ह्या अधिनियमाच्या कारणांसाठीं मत्स्याधिकारी म्हणून नेमलेला अधिकारी, असा समजावा व तींत, मत्स्याधिकाऱ्याचे अधिकार चालवण्यासाठीं व त्याचीं कामें करण्यासाठीं सरकारनें नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो :

परंतु, सब-इन्स्पेक्टरच्या दर्जापेक्षां कमी दर्जा असलेल्या कोणत्याहि पोलीस अधिकाऱ्यास, मत्स्याधिकारी म्हणून किंवा मत्स्याधिकाऱ्याचे अधिकार चालवण्यासाठीं व त्याचीं कामें करण्यासाठीं नेमतां कामा नये ;

(क) "बसविलेलें यंत्र" या संज्ञेचा अर्थ, जमिनींत बसविलेलें किंवा इतर कोणत्याहि प्रकारें एका जागीं स्थिर केलेलें मासळी धरण्याचें कोणतेंहि जाळें, पिंजरा, सांपळा किंवा इतर साधन, असा समजावा ;

(ड) "विहित केलेलें" म्हणजे या अधिनियमान्वयें केलेल्या नियमान्वयें विहित केलेलें ;

(इ) "खासगी जलाशय" या संज्ञेचा अर्थ,—

(एक) कोणत्याहि इसमाची पूर्ण मालकी असलेला जलाशय, किंवा

(दोन) ज्यामध्यें कोणत्याहि इसमास मालक किंवा पट्टेदार या नात्यानें किंवा इतर कोणत्याहि नात्यानें—त्या त्या वेळीं मासेमारीचा पूर्ण हक्क आहे असा जलाशय, असा समजावा; परंतु तींत, कोणतीहि नदी, कालवा, ओढा, झील, किंवा कोणतीहि नदी, कालवा, ओढा किंवा झील यांना साधारणपणें प्रत्यक्ष मिळणाऱ्या पाण्याच्या कोणत्याहि प्रवाहाचा समावेश होत नाहीं;

स्पष्टीकरण.—मालकाशिवाय इतर एखाद्या इसमास वहिवाटीवरून जलाशयांत मासेमारी करण्याचा हक्क आहे केवळ एवढ्याच कारणामुळें उक्त जलाशय या व्याख्येच्या अर्थाप्रमाणें "खासगी जलाशय" असण्याचें बंद होणार नाहीं.

(फ) महाराष्ट्र राज्याच्या संबंधांत "जल प्रांगण" या संज्ञेचा अर्थ, भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एस् आर् ओ ६६९, दिनांक २२ मार्च १९५६, यामध्यें या बाबतींत प्रसिद्ध केलेल्या राष्ट्रपतींच्या उद्घोषणेनुसारच्या योग्य त्या मूळ रेषेपासून मोजण्यांत आलेल्या समुद्रांतील सहा मैलांच्या आंतील अंतरांतील किंवा यानंतर, त्या बाबतींत वेळोवेळीं योग्य रीत्या निश्चित करण्यांत येईल अशा अंतरांतील, राज्याच्या किनाऱ्यांशीं संलग्न असलेल्या खुल्या समुद्राचा कोणताहि भाग, असा समजावा.

**पाण्यांत स्फोट करून किंवा विष टाकून मासळीचा नाश करणें.**

३. (१) जर कोणताहि इसम,—

(अ) कोणत्याहि जलाशयांतील (कोणत्याहि जल प्रांगणाचा समावेश करून) मासळी धरण्याच्या किंवा त्यांचा नाश करण्याच्या हेतूनें कोणत्याहि डायनामाईटचा किंवा इतर स्फोटक पदार्थांचा उपयोग करील; किंवा

(ब) अशा जलाशयांतील कोणतीहि मासळी धरण्याच्या किंवा त्यांचा नाश करण्याच्या हेतूनें अशा जलाशयांत कोणतेंहि वीष, चुना किंवा अपायकारक पदार्थ टाकील,

तर दोषी ठरविण्यांत आल्यावर, त्यास पराकाष्ठा दोन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा दोनशें रुपये दंडाची शिक्षा होईल.

(२) राज्य सरकारास, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, कोणत्याहि निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांत पोट-कलम (१), कंडिका (ब) ची अंमलबजावणी तात्पुरती स्थगित करण्याचा अधिकार आहे, आणि तशाच रीतीनें, त्यास अशा कोणत्याहि अधिसूचनेंत फेरफार करण्याचा किंवा ती रद्द करण्याचा अधिकार आहे.

**निवड केलेल्या जलाशयांतील मासळीचें संरक्षण.**

४. (१) राज्य सरकारास पोट-कलम (३) मध्यें निर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याहि गोष्टींबाबत नियम करण्याचा अधिकार आहे; आणि त्यास, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, असे सर्व किंवा कोणतेहि नियम, राज्य सरकार उक्त अधिसूचनेंत निर्दिष्ट करील अशा (खासगी जलाशय नसलेल्या) जलाशयास लागू करण्याचा अधिकार आहे.

(२) राज्य सरकारास, तशाच अधिसूचनेद्वारें, खासगी जलाशयाच्या मालकाच्या आणि त्या-त्या वेळीं त्यामध्यें मासेमारीचा कोणताहि संपूर्ण हक्क असणाऱ्या सर्व इसमांच्या लेखी संमतीनें असे नियम किंवा अशा नियमांपैकीं कोणतेहि नियम, अशा कोणत्याहि खासगी जलाशयास लागू करण्याचा अधिकार आहे.

(३) अशा नियमांद्वारें—

(अ) पुढीलपैकीं सर्व किंवा कोणत्याहि गोष्टीस मनाई करण्याचा किंवा त्यासंबंधीं नियमन करण्याचा अधिकार आहे म्हणजे,—

(१) कायम यंत्र उभारणें व त्याचा उपयोग करणें;

(२) हंगामी किंवा कायम स्वरुपाचा बंधारा, धरणें आणि बांध बांधणें ;

(३) जाळ्याच्या धाग्यांतील फटीची लांबी, रुंदी व आकार आणि उपयोग करावयाच्या जाळ्यांचा प्रकार आणि त्यांचा उपयोग करण्याची रीत, आणि त्यांचा ज्या शर्तींवर वापर करण्यांत येईल, कांहीं असल्यास त्या शर्ती;

(४) एकाच वेळीं मासे धरण्याच्या एकाहून अधिक पद्धतींचा उपयोग करणें;

(च) कोणत्याहि पाण्यांत त्यांतील कोणतेहि मासे पकडण्याच्या किंवा नष्ट करण्याच्या उद्देशानें कोणतीहि बंदूक, धनुष्य, बाण किंवा तत्सम हत्यार वापरण्यांत मनाई करणें ;

(क) मासे असणाऱ्या कोणत्याहि पाण्यांत, माशांस किंवा माशांचा खाद्य पदार्थांस अपकारक ठरेल असा व ज्यांबाबत नियमांत उल्लेख करण्यांत आला असेल असा कोणताहि द्रव पदार्थ किंवा घनरूप पदार्थ टाकण्यास किंवा सोडून देण्यास मनाई करणें किंवा त्याबाबत नियमन करणें ; परन्तु अशा अधिकारामुळें त्या त्या वेळीं अंमलांत असणाऱ्या कोणत्याहि विधीद्वारें किंवा तदन्वयें देण्यांत आलेल्या कोणत्याहि अधिकारास अनुसरून मलप्रवाह सोडण्याच्या स्थानिक प्राधिकाऱ्याच्या कोणत्याहि अधिकारांस बाध येणार नाहीं ;

(ड) कोणत्याहि विहित केलेल्या जातीचे कोणतेहि मासे ज्या हंगामांत मारण्यास, पकडण्यास किंवा विकण्यास मनाई करण्यांत येईल ते हंगाम ठरविणें ;

(इ) कोणत्याहि विशिष्ट जलाशयांत, विहित केलेल्या मुदतींत सर्व प्रकारच्या मासेमारीस प्रतिबंध करणें ;

(फ) सामान्यतः या अधिनियमाची अधिक चांगली अंमलबजावणी करण्यासाठीं आणि राज्यांत किंवा त्याच्या कोणत्याहि क्षेत्रांत मासेमारीच्या धंद्याचें अधिक चांगलें संरक्षण करणें, तो जतन करणें आणि त्यांत सुधारणा करण्यासाठीं तरतूद करण्याचा अधिकार आहे.

(४) या कलमान्वयें कोणताहि नियम करतांना राज्य सरकारला पुढील गोष्टींबाबत तरतूद करण्याचा अधिकार असेल, म्हणजे,—

(अ) नियमांचें उल्लंघन करून बसविलेलें किंवा वापरलेलें यंत्र किंवा यंत्रसामग्री किंवा वापरलेलें जाळें धरणें, तें काढून टाकणें आणि जप्त करणें ;

(ब) अशा बसविलेल्या यंत्राच्या किंवा यंत्रसामग्रीच्या किंवा जाळ्याच्या साहाय्यानें पकडलेले कोणतेहि मासे जप्त करणें.

(५) या कलमान्वयें केलेले नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(६) या कलमान्वयें केलेले सर्व नियम राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढें ते करण्यांत आल्यानंतर शक्य तितक्या लवकर मांडण्यांत आले पाहिजेत आणि राज्य विधान-मंडळ ते अशा रीतीनें ज्या अधिवेशनांत ठेवण्यांत आले त्या अधिवेशनांत किंवा त्याच्या लगतपुढील अधिवेशनांत त्यांत ज्या सुधारणा करील त्यास पात्र असतील आणि ते राजपत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत.

५. (१) राज्य सरकारला, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें सर्वसामान्यतः किंवा कोणत्याहि निर्दिष्ट केलेल्या प्रदेशांत, जे मासे पकडणें कलम ४ अन्वयें केलेल्या कोणत्याहि नियमान्वयें बेकायदेशीर ठरविलें असेल असे मासे विक्रीसाठीं किंवा वस्तुविनिमयासाठीं देऊं करण्यास किंवा मांडून ठेवण्यास मनाई करण्याचा अधिकार आहे. मग राज्याबाहेर कोणत्याहि ठिकाणीं असे मासे नेणें कायद्यास धरून असेल तरीहि या गोष्टीची दखल घेतली जाणार नाहीं.

(२) विक्रीसाठीं किंवा वस्तुविनिमयासाठीं देऊं केलेले किंवा मांडून ठेवलेले कोणतेहि मासे या कलमाचें उल्लंघन करून विक्रीसाठीं किंवा वस्तुविनिमयासाठीं देऊं करण्यांत किंवा मांडून ठेवण्यांत आले नाहींत असें सिद्ध करण्याची जबाबदारी असे मासे विक्रीसाठीं किंवा वस्तुविनिमयासाठीं देऊं करणाऱ्या किंवा मांडून ठेवणाऱ्या इसमावर असेल.

बेकायदेशीरपणें पकडलेल्या माशांच्या विक्रीस किंवा वस्तुविनिमय करण्यास मनाई करण्याचा अधिकार.

६

शास्ति.

६. जर कोणत्याहि इसमानें हा अधिनियम किंवा तदन्वयें केलेले नियम किंवा आदेश यांच्या कोणत्याहि उपबंधाचें उल्लंघन केलें तर, त्या अपराधाबद्दल कोणत्याहि इतर शिक्षेची तरतूद करण्यांत आली नसेल तर, त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा तीन महिन्यांपर्यंत कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पांचशें रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील. आणि जर दोषसिद्धीनंतर उल्लंघन करणें चालू ठेवण्यांत आलें तर ज्या दिवसांपर्यंत उल्लंघन चालू ठेवण्यांत आलें अशा प्रत्येक दिवसास पराकाष्ठा पन्नास रुपयांच्या आणखी दंडास तो इसम पात्र ठरेल.

या अधिनियमान्वयेंच्या अपराधाबद्दल अधिपत्रावांचून अटक करणें.

७. (१) पोलीस उप-निरीक्षकापेक्षां कमी दर्जा नसलेल्या कोणत्याहि पोलीस अधिकाऱ्यास किंवा राज्य सरकारनें याबाबत खास अधिकार दिलेल्या कोणत्याहि इसमास, त्याच्या मतें कलम ३ किंवा कलम ६ अन्वयें शिक्षेस पात्र असा कोणताहि अपराध करीत असणाऱ्या कोणत्याहि इसमास, जर तो इसम त्याचें नांव व पत्ता देण्यास नकार देईल तर किंवा जर नांव व पत्ता दिला असल्यास, त्याच्या बिनचूकपणाबद्दल शंका घेण्यास कारण असेल तर, अधिपत्रावांचून अटक करण्याचा अधिकार आहे.

(२) या कलमान्वयें अटक केलेल्या इसमास त्याचें नांव व पत्ता याबाबत बिनचूकपणें खात्री करून घेण्यांत येईतोंपर्यंत स्थानबद्ध करण्याचा अधिकार आहे:

परंतु, अशा रीतीनें अटक केलेल्या इसमास फौजदारी न्यायाधिशासमोर हजर करण्यास आवश्यक असेल अशा मुदतीपेक्षां (अशी मुदत, अशा इसमास ज्या ठिकाणीं अटक करण्यांत आली त्या ठिकाणापासून फौजदारी न्यायाधिशाच्या न्यायालयापर्यंतच्या प्रवासास आवश्यक तो वेळ सोडून देतां, चोवीस तासांहून अधिक असणार नाहीं) कोणत्याहि जास्त वेळेपर्यंत स्थानबद्ध करतां येणार नाहीं. परंतु दंड प्रक्रिया संहिता, १८९८ च्या उपबंधानुसार फौजदारी न्यायाधिशानें स्थानबद्ध करण्यासाठीं तसा आदेश दिला असेल त्यास जास्त वेळेपर्यंत अटकेंत ठेवतां येईल.

दुसऱ्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाहून कनिष्ठ दर्जाचा क्षेत्राधिकार वगळणें.

८. (१) दुसऱ्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधिशाच्या न्यायालयाहून कनिष्ठ दर्जाच्या कोणत्याहि न्यायालयानें या अधिनियमान्वयेंच्या कोणत्याहि अपराधाचा इन्साफ करतां कामा नये.

(२) मत्स्याधिकारी किंवा उप-निरीक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा पोलीस अधिकारी किंवा राज्य सरकारनें याबाबत अधिकृत केलेला कोणताहि इतर इसम किंवा इसमांचा वर्ग यांजकडून या अधिनियमाखालील कोणत्याहि अपराधासंबंधीं घडलेल्या वस्तुस्थितीचें लेखी प्रतिवृत्त मिळाल्याखेरीज कोणत्याहि न्यायालयानें अशा अपराधाची दखल घेतां कामा नये.

अपराधांची तडजोड करण्याचा अधिकार.

९. (१) जिल्हा फौजदारी न्यायाधिशास अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि अपराधाबाबत कायदेशीर उपाययोजना करण्यापूर्वीं किंवा त्यानंतर, अशा अपराधाचा आरोप ठेवलेल्या कोणत्याहि इसमाकडून, तडजोड म्हणून शंभर रुपयांहून अधिक नसेल अशी रक्कम स्वीकारण्याचा अधिकार आहे.

(२) अशा इसमानें अशी रक्कम दिल्यावर, जर असा इसम अभिरक्षेंत असेल तर, त्यास सोडून देण्यांत आलें पाहिजे आणि त्याजविरुद्ध अशा अपराधासंबंधीं कोणत्याहि फौजदारी न्यायालयांत कोणतेंहि कामकाज दाखल केलें असेल तर, अशा रीतीनें करण्यांत आलेल्या तडजोडीमुळें तो दोषमुक्त झाला आहे असें समजण्यांत आलें पाहिजे आणि त्याच्या कबजांतून धरण्यांत आलेली कोणतीहि मालमत्ता मुक्त करण्यांत आली पाहिजे आणि त्या इसमाविरुद्ध अशा अपराधासंबंधांत आणखी फौजदारी कार्यवाही करण्यांत येतां कामा नये.

१०. या अधिनियमान्वयें अधिकार चालविण्यासाठीं आणि कर्तव्यें पार पाडण्यासाठीं अधिकृत केलेले सर्व इसम हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असें समजलें पाहिजे. अधिकारी हे लोकसेवक आहेत असें समजणें.

११. कोणत्याहि इसमाविरुद्ध किंवा राज्य सरकारविरुद्ध, या अधिनियमान्वयें सद्भावनेनें केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल कोणताहि दावा, खटला किंवा इतर कायदेशीर उपाययोजना दाखल करतां येणार नाहीं. निस्तारण.

१२. या अधिनियमान्वयें किंवा तदनुसार केलेल्या नियमान्वयें राज्य सरकारला येणें असलेली कोणतीहि पैशांची रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यांत आली पाहिजे. अधिनियमान्वयें येणें असलेली रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोगी असणें.

१३. या अधिनियमांतील कोणताहि मजकूर जल प्रांगणापलीकडे मासे पकडण्यास आणि मत्स्योद्योग करण्यास लागू असणार नाहीं. बचाव.

१४. हा अधिनियम अंमलांत आल्यावर, पुढीलपैकीं प्रत्येक अधिनियम रद्द होईल :— रद्द करणें व बचाव.

(अ) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रास लागू असलेला भारताचा मासेमारीबाबत अधिनियम, १८९७ (सन १८९७ चा अधिनियम क्रमांक ६);

(ब) महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रास लागू असलेला मासेमारीबाबत अधिनियम (सन १३५६ फसलीचा हैदराबाद अधिनियम क्रमांक २३);

(क) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशास लागू केलेला म०प्रांत व वऱ्हाड मासेमारीबाबत अधिनियम, १९४८ (सन १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाडचा अधिनियम क्रमांक ८) :

परंतु, अधिनियम अशा रीतीनें रद्द करण्यांत आल्यावर, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे उपबंध, असे अधिनियम रद्द होण्याच्या संबंधांत जणूं तो अधिनियम, महाराष्ट्र अधिनियमान्वयें रद्द केलेला अधिनियम होता असें समजून लागू होतील :

तसेंच, वरील परंतुकास अधीन राहून, अशा रीतीनें रद्द केलेल्या कोणत्याहि अधिनियमान्वयें किंवा तदनुसार केलेली कोणतीहि गोष्ट किंवा केलेली कोणतीहि उपाययोजना (यांत केलेला कोणताहि नियम, काढलेली अधिसूचना आणि केलेली नेमणूक यांचा समावेश होतो), ती जेथवर या अधिनियमाच्या उपबंधान्वयें विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमान्वयें किंवा तदनुसार केलेली आहे असें समजण्यांत आलें पाहिजे आणि ती या अधिनियमान्वयें केलेल्या कोणत्याहि गोष्टीवरून किंवा योजनेवरून रद्द करण्यांत येईपर्यंत अंमलांत असण्याचें चालू राहील.

## अनुसूचि.

(कलम ९ पहा.)

### कलम ९ अन्वयें तडजोड करण्याजोग्या अपराधांचें वर्णन.

१. विहित केलेल्या जाळ्यांपेक्षां लहान फटीचीं जाळीं (मेश) असलेल्या जाळ्यानें मासे पकडणें;

२. बंद हंगामांत ज्या जातीचे मासे मारण्यास मनाई केली असेल असे कोणतेहि मासे मारणें किंवा पकडणें किंवा विकणें अथवा ते मारण्याचा, पकडण्याचा किंवा विकण्याचा प्रयत्न करणें ;

३. विहित केलेल्या गिअरहून किंवा पद्धतीहून वेगळ्या अशा कोणत्याहि गिअरनें किंवा पद्धतीनें मासे मारणें किंवा मासे मारण्याचा प्रयत्न करणें ;

४. या अधिनियमान्वयें केलेल्या नियमान्वयें मनाई केली असेल तेव्हां, कोणत्याहि एका वेळीं मासे पकडण्याच्या एकापेक्षां अधिक पद्धतींचा उपयोग करणें ;

५. मनाई केलेल्या पाण्यांत मासे पकडणें किंवा ते पकडण्याचा प्रयत्न करणें ;

६. कलम ५ अन्वयें काढलेल्या अधिसूचनेन्वयें कोणत्याहि निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांत जे कोणतेहि मासे विक्रीसाठीं किंवा वस्तुविनिमयासाठीं देऊं करण्यास किंवा मांडून ठेवण्यास मनाई करण्यांत आली असेल, ते विक्रीसाठीं किंवा वस्तुविनिमयासाठीं देऊं करणें किंवा मांडून ठेवणें.

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.